# <u>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ</u>

**परिपत्रक**
दूरध्वनी क्र : ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५
फॅक्स क्र.: ०२२-४२२१००१९
ई-मेल : pro.mlwb-mh@gov.in

मका/ग्रंथालय/१६-१७/११७
हु.बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार
क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन (प), मुंबई - ४०० ०१३
दिनांक - ०१.०७.२०१६

## विषय : साहित्य प्रकाशन अनुदान योजना

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ अंतर्गत येणा-या आस्थापना/व्यवस्थापनामधील कामगारांना त्यांच्या स्वलिखित साहित्याच्या प्रकाशनासाठी प्रोत्साहनपर रु.१०,०००/- पर्यंत अनुदान देण्याची योजना आहे. स्वलिखित कविता संग्रह, कथासंग्रह, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी साहित्य प्रकारातील प्रकाशित पुस्तकास सदर अनुदान दिले जाते. पात्र अर्जदारांच्या बँक खात्यात ऑनलाईन (ईसीएस/एनईएफटी इ.) द्वारे लाभाची रक्कम जमा केली जाईल.

**नियम व अटी :-**

१. अर्जदार महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या अंतर्गत मंडळाकडे वर्गणी भरणारा असावा.
२. कामगारांचे स्वलिखित कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, नाटक इ. साहित्य प्रकाशित झालेले असावे.
३. साहित्य अश्लिल, वादग्रस्त आणि अंधश्रद्धा व अनैतिक बाबींना प्रोत्साहन देणारे नसावे.
४. कामगार लिखित साहित्याचे परीक्षण करुन अनुदान देण्याबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत मंडळाचा निर्णय अंतिम असेल.
५. कामगार साहित्य परीक्षण समितीचा अभिप्राय प्रतिकूल असल्यास त्या साहित्यास अनुदान दिले जाणार नाही व सदर साहित्य कामगारास परत पाठविले जाणार नाही.
६. साहित्य संबंधित चालू आर्थिक वर्षात किंवा जास्तीत-जास्त मागील दोन वर्षात प्रकाशित झालेले असावे. त्यापूर्वी प्रकाशित साहित्य अनुदानास पात्र राहणार नाही.
७. सदर योजनेचा लाभ कामगार लेखकास कोणत्याही एकाच साहित्यासाठी एकदाच दिला जाईल. यापुर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या साहित्यिकास पुन्हा अर्ज करता येणार नाही.
८. पात्र लाभार्थीस जास्तीत-जास्त रु.१००००/- अथवा प्रत्यक्ष छपाई खर्च यापैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य मंजूर केले जाईल.
९. आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीच्या अधिन राहुन लाभार्थींची संख्या ठरविण्यात येईल.

१०. अनुदान लाभार्थीच्या बँक खात्यात ऑनलाईन जमा होणार आहे. त्यासाठी अर्जदाराचे बँकेत खाते असणे बंधनकारक आहे. **सदर बँक खाते अर्जदाराने आधार क्रमांकाशी लिंक करुन घ्यावे.**

११. अपंग कामगार लेखकाच्या प्रकाशित साहित्यास अनुदानासाठी प्राधान्य दिले जाईल.

१२. प्रकाशित साहित्य दि.३० नोव्हेंबरपर्यत स्वीकारले जाईल.

१३. अनुदानाबाबत लाभार्थींना माहे जानेवारीपर्यंत निर्णय कळविला जाईल. त्यादरम्यान चौकशी करु नये.

१४. पुढील आदेश निघेपर्यंत सदर परिपत्रक लागू राहिल.

<u>अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-</u>

१) अर्ज दोन प्रतीत सादर करावा. एक संच मूळ अर्जाचा आणि दुसरा संच संपूर्ण कागदपत्रांची झेरॉक्स असावा.

२) माहे जूनची वेतन पावती **किंवा** कामगार कल्याण निधी कपात झाल्याची नोंद असलेला आस्थापनेचा दाखला.

३) साहित्य प्रकाशनासाठी झालेल्या खर्चाचे मूळ (ओरिजनल) बील.

४) अर्जदाराचे नाव, बँक खाते क्रमांक, बँकेचा मायकर क्रमांक व आय.एफ.एस.सी.क्रमांक यांची नोंद असलेला बँकेचा कॅन्सल चेक (रद्द चेक) किंवा पासबुकची झेरॉक्स.

५) आधार कार्डची झेरॉक्स. अर्जदारांनी आपल्या बँक खात्याशी आधार कार्ड लिंक करुन घ्यावे.

६) प्रकाशित साहित्याच्या (पुस्तक) दोन प्रती.

<u>सोबत : अर्जाचा नमुना.</u>

कल्याण आयुक्त

प्रत,

१. सर्व अधिकारी, म.का.मुंबई / का.क्री.भवन, मुंबई
२. सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
३. सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
४. कामगार विकास अधिकारी, पुणे / नागपूर
५. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
६. सर्व केंद्र प्रमुख

सूचना – गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.